सं १९५८

# व्यापाऱ्यांना आवाहन

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२८८

विनोबा

REFBK-0015732

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

# व्यापाऱ्यांना आवाहन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 28935 वि: निबंध
क्रमांक 9288 नों: दि: 1/7/75

**विनोबा**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 95032
संदर्भ शाखा (स्थळप्रत)

REFBK-0015732

परंधाम वि

# दोन शब्द

२४ मार्च '५६ रोजीं अडोनी येथें सार्वजनिक सभेंत मुख्यतः व्यापाऱ्यांना अुद्देशून पू. विनोबांनीं जें भाषण दिलें तेंच पुस्तकाकारांत प्रसिद्ध करीत आहोंत.

आमचा विश्वास आहे कीं हिन्दुस्थानचे व्यापारी विनोबांचें हें आवाहन ऐकतील, समजतील आणि पुढें येअून देशाचा व दुनियेचा बचाव करतील. करुणेचें राज्य स्थापन करण्याची संधि ते आपल्या हातून जाअूं देणार नाहींत.

प्रकाशक

दा. क्र. ..........

# व्यापाऱ्यांना आवाहन

## व्यापार एक सुव्यवस्थित धर्म

हिंदुस्थान हा च बहुधा असा एक देश आहे कीं जेथें व्यापार हा एक सुव्यवस्थित धर्म मानला गेला आहे. व्यापार प्रामाणिकपणें केला पाहिजे असें सर्व च धर्मांचें सांगणें आहे. प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठा हा एक धर्म आहे ही सर्व-मान्य गोष्ट आहे. पण व्यापार सुद्धां एक धर्म आहे ह्या गोष्टीची समाजाला जाणीव ह्या च देशांत करून देण्यांत आलेली आहे.

समाजांतील कामाची वांटणी करतांना व्यापाऱ्यांचा एक सुव्यवस्थित वर्ग मानला गेला. वैश्यांचा वाणिज्य हा धर्म आहे असा शास्त्रकारांचा आदेश आहे. हा आपल्या देशाचा विशेष आहे.

निष्काम बुद्धीनें व अनन्य निष्ठेनें जो वेदांचें अध्ययन करील तो ज्याप्रमाणें मोक्षाचा अधिकारी होतो, त्या च प्रमाणें सेवा-बुद्धीनें निष्कामतापूर्वक व्यापार करणाऱ्या मनुष्याला हि मोक्षाचा अधिकार प्राप्त होतो असें आम्हीं मानलें आहे. हा एक विशेष विचार आहे. ह्यांत समाजांतील भिन्न-भिन्न कामांना समान प्रतिष्ठा दिलेली आहे. निष्काम व कर्तव्यपरायण ब्राह्मणाला जो मोक्ष प्राप्त होतो तो च निष्काम व कर्तव्यपरायण वैश्याला हि प्राप्त होतो. मग काय दोघांच्या मोक्षांत कांहीं फरक असेल? मोक्षांत कोणत्या हि प्रकारचा दर्जा किंवा फरक असूं शकत नाहीं. सेवा करणारा कर्तव्यपरायण माणूस मग तो ब्राह्मण असो, क्षत्रिय असो, किंवा कोणी हि असो, मोक्षाचा समान दर्जाचा अधिकारी होतो अशी ही अद्‌भुत योजना आहे. म्हणजे समाज-सेवा-परायण वैश्याला किंवा व्यापाऱ्याला साधकाच्या आणि भक्ताच्या बगींत

दाखल केलेलें आहे. एवढी मोठी जबाबदारी व प्रतिष्ठा व्यापाऱ्यांना हिंदुस्थानांत धर्म-शास्त्रद्वारां दिली गेली आहे. हिंदुस्थानच्या मानसावर ह्या गोष्टीचा खूप परिणाम झाला.

## मांसाहार-त्याग

हिंदुस्थानांत जी आध्यात्मिक विचारसरणी चालली तींत दया-भावाला विशेष स्थान आढळतें. मानव-समाजाला अन्य प्राण्यांविषयीं हि प्रेम राखलें पाहिजे ह्या गोष्टीचा हि आग्रह राखण्यांत आला आहे. म्हणून येथील असंख्य लोकांनीं मांसाशन-त्यागाचा प्रयोग केला. अशी घटना जगांत दुसरीकडे घडली नाहीं. अलीकडे पाश्चिमात्य देशांत असें कांहीं व्यक्तिगत व सामूहिक प्रयोग झालेले आहेत. म्हणजे शाकाहारी असणारे मांसाहार-निवृत्त संघ तेथें आहेत. परंतु हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें मांसाशन-निवृत्त जाती आढळतात त्याप्रमाणें इतर देशांत आढळत नाहींत. आमच्या समाजांत सध्यां अनेक दुर्गुण आहेत, त्यामुळें मांसाहार-निवृत्तीबद्दल आमच्या मनांत विशेष आदर नाहीं. पण ते दुर्गुण आमच्या कमाईचे आहेत, आणि हें लक्षांत घेऊन आम्हीं भूतदयेचा जो एक महान् प्रयोग केला त्याचें महत्त्व आम्ही कमी करूं शकत नाहीं.

दयेनें प्रेरित होऊन मांसाहार सोडणाऱ्या अशा समाजांत मुख्यतः वैश्य व व्यापारी समाज मुख्य आहे. हा अहिंसेचा व दयेचा विचार जैन धर्मामुळें फैलावला व आमच्या भक्ति-मार्गानें तो उचलला. व्यापारी वर्गावर त्याचा फार प्रभाव पडला व सध्यां व्यापारी वर्ग च मुख्यतः मांसाहार निवृत्त आहे. ही गोष्ट मी लहान-सहान समजत नाहीं. एका देशाचा बहुतेक व्यापारी वर्ग अशा प्रकारें दया-भाव-प्रेरित होऊन मांसाहारापासून निवृत्त-

झाला. हा एक महान् प्रयोग आहे व आपल्या देशाचा हा एक विशेष अनुभव आहे. शास्त्रकारांनीं व्यापाऱ्यांवर जो विश्वास दर्शविला, त्याचा परिणाम येथल्या व्यापारी-वर्गावर अशा प्रकारें झालेला आहे. म्हणून हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांत दया-भावाची मात्रा विशेष आहे असें म्हणावें लागेल. त्या च बरोबर आपणाला हें हि मानावें लागेल कीं सध्यांच्या विषम काळांत पुष्कळांच्या हृदयांत निष्ठुरता हि आलेली आहे. आमची समाज-रचना, विशेषत: आर्थिक-रचना इतकी चुकीची झालेली आहे कीं मनुष्याची इच्छा असो वा नसो तो निष्ठुर बनतो. सर्वांबरोबर व्यापाऱ्यांच्या ठिकाणीं हि पुष्कळशी निष्ठुरता आलेली आहे. पण इतके असून हि आमच्या व्यापाऱ्यांत दयाभावाची मात्रा पुष्कळ आहे हें कबूल करावें लागेल.

## दया-गुणाचा विकास

एका वर्गांत जेव्हां दयेचा इतका अंश आम्हांला दिसतो तेव्हां त्याचा फायदा आपल्याला कसा घेतां येईल हा आमच्या-समोर विचाराचा प्रश्न आहे. व्यापारी वर्गाची ही विशेषता आपल्या देशाचा विशेष आहे असें मी मानतों. पण व्यापारी वर्गांतला जो दुसरा विशेष म्हणजे व्यवस्था-शक्ति, तो फक्त आमच्या च व्यापाऱ्यांचा विशेष आहे असें नव्हे. जगांतील सर्व व्यापाऱ्यांच्या ठिकाणीं तो गुण आहे. व्यवस्था-शक्तीचा सामान्य गुण व दया-भावाचा विशेष गुण ह्या दोहोंच्या बळावर व्यापारी आपल्या देशासाठीं पुष्कळ कांहीं करूं शकतो.

दया-गुण हा सामान्य गुण नव्हे. मानव-समाजाच्या दृष्टीनें तो बहुमोल आहे. दयेशिवाय कोणता हि समाज क्षणभर हि टिकूं शकत नाहीं. पाश्चिमात्य समाजांत व हिंदुस्थानच्या समाजांत

दयेचीं कितीक कार्यें सतत चालू असतात. आजाऱ्यांच्या सेवेसाठीं जितके कांहीं प्रयत्न दुनियेंत होतात ते दया-भाव प्रेरित असतात. शस्त्रक्रियेंत होणाऱ्या नवीन नवीन सुधारणा दयेचीं कार्यें आहेत. लढाईंत सुद्धां सेवा-भाव प्रेरित होऊन शुश्रूषा-पथकें जात असतात. अशा प्रकारें जीवनांत सर्वत्र कोणत्या ना कोणत्या प्रकारें दया-भाव आढळून येतो. त्यामुळें च जीवनाला मधुरता येते.

धर्म-शास्त्रकारांनीं परमेश्वराचें रूप च दयामय मानलेलें आहे. विशेषतः इस्लाम धर्मांत अल्लाला रहमान, रहीम अशीं विशेषणें आहेत. त्याचा अर्थ परम दयाळू असा आहे. सर्व धर्मांनीं दया ईश्वराचा गुण मानलेला असून वैष्णवांनीं वारंवार त्या गुणाचें मनन व चिंतन केलेलें आहे. दया, क्षमा, करुणा हे सर्व दिव्य गुण मानवांना सदा सर्वदा पूजनीय आहेत. इतकें असून हि आज दुनियेंत दयेचें, करुणेचें राज्य नाहीं असें म्हणावें लागतें. राज्य शक्तीचें आहे. शक्ति राज्याची अधिष्ठात्री देवता आहे. दया, करुणा तिच्या दासी म्हणून काम करीत आहेत.

## करुणा कशी वाढेल ?

आपल्या देशाला मजबूत बनविण्याचा विचार करतांना कोणत्या हि देशाचें सरकार देशांत करुणा कशी वाढेल असा विचार करीत नाहीं तें देशाची लष्करी शक्ति वाढविण्याचा विचार करतें. आपल्या देशांत करुणेची वृद्धि झाली तर ह्या देशाच्या द्वारें दुनियेला शांतता प्राप्त होईल व साऱ्या दुनियेच्या जनतेला करुणा-गुणानें आपण जिंकून टाकूं असा विचार सरकारच्या मनांत येत नाहीं. करुणेचा मानवांवर केवढा प्रभाव पडतो ही गोष्ट जगजाहीर आहे. करोडों लोक येशूचें नांव केवळ त्याच्या करुणा-गुणामुळें घेत आहेत. बुद्ध भगवानाचा जयजयकार करणारे चाळीस

मराठी ... ग्रं. क्र. १५५८३८

चाळीस करोड लोक दुनियेंत आहेत. ते केवळ करुणेमुळें व बुद्धाचें स्मरण करीत आहेत. आज कोटयवधि लोकांच्या मनांवर, जीवनांवर व मरणांवर अधिकांत अधिक प्रभाव कशाचा असेल तर तो करुणेचा आहे.

करुणेचा हा प्रभाव अगदीं जगजाहीर आहे. इतकें असून हि लोकांच्या संमतीनें राष्ट्राचें नियोजन करणारीं सरकारें राष्ट्राला मजबूत बनविण्यासाठीं करुणेचा प्रचार करीत नाहींत, लष्करी शक्तीचा प्रचार करतात. पाकिस्तान सरकारचा ७०% खर्च लष्करावर होत आहे व तें असें मानतें कीं ह्यानें देश मजबूत बनेल. हिंदुस्थानचे लोक हि सरकारला विचारतात कीं आमच्या रक्षणासाठीं व देशाच्या मजबूतीसाठीं तुम्ही काय करीत आहांत? आमचे पुढारी हि असें मानतात कीं आम्ही जागरूक आहोंत, आणि ह्या प्रश्नाविषयीं उदासीन नाहीं. पण केवळ तात्कालिक दृष्टीनें काम करणें योग्य नव्हे. दूरदृष्टि राखावी लागते. देश-सेवेचीं दुसरीं हि कामें आहेत, त्यांच्याकडे दुर्लक्ष करतां येत नाहीं. पण आम्ही लश्कराकडे हि लक्ष देत आहोंत असें मनांत दयेचा अत्यंत आदर राखणाऱ्या आमच्या नेत्यांना लोकांना सांगावें लागतें.

## शक्तीची आराधना

हें वर्ष भगवान् बुद्धाच्या २५०० वर्षांच्या समाप्तीचें वर्ष मानलें गेलें आहे. जगातील अनेक देशांत ह्या निमित्त उत्सव होतील. आपल्या देशांत हि फार मोठ्या प्रमाणावर हा उत्सव साजरा करण्यांत येणार आहे. अशा सर्वश्रेष्ठ कारुण्यमूर्तीचा जन्म आपल्या देशांत झाला ह्याचा त्याला अभिमान वाटतो. एका बाजूला करुणेबद्दलचा आदर आणि दुसऱ्या बाजूस मजबूतीसाठीं शक्ति देवतेची पूजा! अशा प्रकारें विचार करणारे आम्ही ढोंगी

आहोंत काय ? आम्ही ढोंगी नाहीं. पण आम्ही मनांत असें ठसवून घेतलें आहे कीं, व्यक्तिगत जीवनाच्या उन्नतीसाठीं करुणा श्रेष्ठ आहे, पण सामुदायिक कल्याणासाठीं शक्तीची आवश्यकता आहे. सध्यांचें युग विज्ञानाचें युग आहे. त्यामुळें सामूहिक सिद्धीची किंमत फार आहे. व्यक्तिगत उन्नतीची गौण आहे. म्हणून दया आणि करुणा ह्या गुणांचें महत्त्व जाणून हि ह्या गुणांचें राज्य चालत नाहीं.

हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांना ही उत्तम संधि मिळालेली आहे असें मी समजतों. हे व्यापारी प्रायः दया-भाव-प्रेरित आहेत. त्यांनीं मांसाहार-त्यागाचा प्रयोग केलेला आहे. ते ह्या कामाला लायक आहेत. करुणेचें राज्य स्थापन करण्याचें काम भगवंतांनीं जणूं त्यांच्यासाठीं राखून ठेवलें आहे. पण हा दया-भाव-प्रेरित व्यापारी आपल्या रक्षणासाठीं लाठीवाला पुरभय्या ठेवतो. कारुण्यांत स्वसंरक्षणाचें सामर्थ्य नाहीं का ? करुणावान लोकांना हि अशा प्रकारें रक्षणाची आवश्यकता कां वाटावी ? ह्याचें कारण हें च कीं, त्यांच्या जीवनांत करुणा-गुणाचें साम्राज्य नाहीं, करुणा-गुण थोडासा मिश्रित आहे एवढें च. ज्या व्यापाराची संपत्ति, बुद्धि आणि व्यवस्थाशक्ति आजूबाजूच्या लोकांच्या सेवेंत खर्च होत असेल, त्याला आपल्या रक्षणासाठीं शिपायांची आवश्यकता कशाला पडेल ?

## महावीर हि, सोनें हि !

बिहारमध्यें एके ठिकाणीं मी जैनांचें मंदिर पाहण्यास गेलों होतों. त्या मंदिरांत महावीर स्वामींची मूर्ति होती. तुरुंगांत ज्याप्रमाणें एका कोटामागून दुसरा कोट आणि दरवाजे असतात त्या प्रमाणें च अनेक कोट व दरवाजे ओलांडून मूर्तीच्या दर्शनासाठीं

आम्हांला जावें लागलें. तुरुंगाप्रमाणें तेथें हि बंदुक घेऊन संत्री पहारा करीत होता. सर्व दरवाजे बंद होते, आमच्यासाठीं एक एक दरवाजा उघडावा लागला. शेवटीं आम्ही जेथें गेलों तेथें महावीर स्वामींची नग्न मूर्ति होती. थंडीवाऱ्यापासून रक्षणासाठीं सुद्धां ज्यांनीं वस्त्र वापरलें नाहीं, त्यांच्या दर्शनासाठीं आम्हांला घेऊन गेले तेव्हां दरवाजे बंद होते आणि संत्र्यांचा खडा पहारा होता. साऱ्या बिहारभर निःसंकोच व निर्भयतापूर्वक जंगलांत विहार करणाऱ्या ह्या मुक्तात्म्याला असे कैद करून कां ठेवावें लागले? एवढ्यासाठीं कीं आंतला पुष्कळसा भाग सोन्यानें मढविलेला होता. महावीर स्वामींना सुवर्णाचा परिग्रह पसंत नव्हता, पण त्यांच्या शिष्यांना त्यांची करुणा पाहिजे होती, परंतु सुवर्णाची प्रतिष्ठा हि ते सोडूं शकत नव्हते. कारण जगांत आज सुवर्णाचें साम्राज्य आहे असें ते मानीत होते. आज दुनियेंतली सर्वांत मोठी शक्ति ज्या देशाची मानली जाते त्या अमेरिकेंत जगांतलें अर्धें सुवर्ण आहे. ह्याचा अर्थ आम्हांला महावीर हि पाहिजेत व सुवर्ण हि पाहिजे. ह्या दोहोंवर आमची समान निष्ठा असून त्या दोहोंतला विरोध आम्हांला दिसत नाहीं, आणि म्हणून बंदुकवाल्याचा खडा पहारा तेथें ठेवावा लागतो. मीं महावीर स्वामींच्या मूर्तीचें दर्शन घेतलें, तेव्हां मला वाटलें कीं त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहत आहेत. मी त्या ठिकाणी जास्त वेळ उभा राहूं शकलों नाहीं. अत्यंत खिन्न मनानें मी परतलों. महा-पुरुषाच्या दर्शनासाठीं म्हणून गेलों, पण दर्शन दुर्दैवाचें घडलें!

विचार करण्यासारखी गोष्ट आहे कीं, करुणेला मान्य करून हि रक्षणाचा सवाल आला असतां शक्ति-देवतेचें स्मरण कां होतें? कारण, आम्हीं आमचें जीवन करुणामय बनविलेलें नाहीं. हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांनीं ह्या गोष्टीचा विचार केला

पाहिजे. असा विचार करण्याची शक्ति त्यांच्या ठिकाणीं आहे. माझे अनेक व्यापारी मित्र आहेत आणि त्यांच्या ठिकाणीं किती तरी आध्यात्मिक वृत्ति व दयाभाव आहे हें मला माहीत आहे. आजच्या समाजरचनेंत थोडेंसें दयेचें काम करून त्यांचें समाधान होतां कामा नये. करुणेच्या पायावर उभा असलेला समाज निर्माण करण्याची हिम्मत त्यांच्यांत पाहिजे. हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांत करुणाभाव आहे आणि त्या च बरोबर व्यवस्थाशक्ति हि आहे. ह्या दोन्ही शक्ति जेथें एकत्र आहेत त्या ठिकाणीं भगवंतांनीं त्यांच्यासाठीं मोठें कार्य नेमून दिलेलें आहे. करुणा-शक्ति आणि व्यवस्था-शक्ति एकत्र होऊन हि जर करुणेचें राज्य बनू शकलें नाहीं तर हैड्रोजन व ऑक्सिजन मिळून पाणी सुद्धां बनणार नाहीं.

## या, देश आणि दुनियेला वाचवा

आज मी हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांना आवाहन करीत आहे. "हे व्यापाऱ्यांनों या! तुमच्या ठिकाणीं धर्म-निष्ठा आहे, शास्त्रकारांची तुमच्यावर श्रद्धा व विश्वास आहे. तुम्हांला प्राप्त असलेल्या गुणांचा उपयोग करून दुनियेला वाचवा. तुम्ही प्रजेचे सेवक बना, सेवक नात्यानें लोकांत जा, त्यांच्या सेवेंत स्वतःला झिजवा." असा च एक वैश्य हिंदुस्थानांत होऊन गेला. आज करोडों लोक त्याचें नांव घेत आहेत, आपण वैश्य आहोंत हें तो अखेरपर्यंत विसरला नव्हता. हिंदुस्थानसाठीं ह्या महात्म्यानें करुणेचीं काय-काय कामें केलीं हें कोणाला माहीत नाहीं? ते कोण होते तें आम्ही सांगू शकत नव्हतों. ब्राह्मणाप्रमाणें पवित्र होते, क्षत्रियाप्रमाणें निर्भय होते, वैश्याप्रमाणें करुणामय होते व शूद्राप्रमाणें सेवामय होते. प्रिय बंधूनो, इतके सर्व असून हि ते ह्या सर्वांहून अधिक कांहीं होते, तर ते बनिया होते. त्यांनीं गोरक्षणाचें काम केलें,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम 28932

खादीला प्रतिष्ठा दिली. ग्रामोद्योग वाढविले, कांतण्याचा उद्योग केला. हीं सारीं कामें अत्यंत कुशल बुद्धीनें त्यांनीं केलीं व देश वासियांकडून करविलीं. महात्मा गांधीहून मी वरचढ आहें असें म्हणणारी व्यक्ति आज हिंदुस्थानांत किंवा दुनियेंत तरी आहे काय ? त्यांच्या नांवानें मी तुम्हांला आवाहन करतों कीं, " व्यापाऱ्यांनो पुढें या व देशाला व दुनियेला वांचवा." आमच्या देशाच्या व्यापाऱ्यांना जर वैश्य-धर्म कळला, त्यांनीं आपली व्यवस्था-शक्ति व करुणा-वृत्ति सर्वांच्या सेवेला लावली, तर आमचें सरकार अत्यंत निर्भय बनेल.

## प्रायव्हेट आणि पब्लिक सेक्टर

आम्हाला समाजवादी रचना करावयाची असल्यामुळें " प्रायव्हेट सेक्टर " (व्यक्तिगत कक्षा) कमी झाला पाहिजे व " पब्लिक सेक्टर " (सार्वजनिक कक्षा) वाढला पाहिजे असें आमचें सरकार म्हणतें, म्हणजे सामुदायिक उद्योग वाढवले पाहिजेत व व्यक्तिगत उद्योगाची प्रतिष्ठा कमी झाली पाहिजे. हा भेद मला कळत नाहीं. सर्वोदय विचारांत अशा भेदाला कांहीं किंमत नाहीं. ह्या दोन सेक्टरांत झगडा आहे असें पहिल्यानें मीं जेव्हां ऐकलें तेव्हां मला आश्चर्य वाटलें. कोणी विचारील कीं, हाताच्या कामाचें महत्त्व जास्त कीं बोटांच्या कामाचें जास्त ? तर अशा प्रश्नाला मी काय उत्तर देणार ? हा हात " पब्लिक सेक्टर " आहे व बोटें " प्रायव्हेट सेक्टर ". जें काम हाताचें तें च बोटांचें व बोटांचें तें च हाताचें. हा भेद कोठून आला हें मला समजत नाहीं. व्यापाऱ्यांची करुणा-बुद्धि व व्यवस्था-शक्ति लोकांच्या सेवेंत खर्च झाली तर त्यांचीं व्यक्तिगत म्हटलीं जाणारीं कामें हि पूर्णपणें सार्वजनिक ठरतील.

वेदांनीं म्हटलें आहे कीं, जो मनुष्य दान-परायण आहे व आपल्या धनाचा उपयोग सतत लोक-सेवेंत करतो त्याच्या जवळच्या धनसंचयाचा कुणाला मत्सर वाटत नाहीं. त्याचा धन-संचय ही

आपली बँक आहे असें लोक समजतात. त्याच्या रक्षणासाठीं त्याला बंदुकवाले पहारेकरी ठेवावे लागणार नाहींत. आजू-बाजूचे सर्व लोक च त्याचे रक्षक बनतील. म्हणून हा भेद मिथ्या आहे. आणि म्हणून समाजवादी रचना करणाऱ्या सरकारला करुणावृत्तीच्या व्यापाऱ्यांपासून भीति बाळगण्याचें कांहीं च कारण नाहीं. व्यापाऱ्यांनीं पुढें येऊन म्हटलें पाहिजे कीं, तुम्ही काय साम्यवादी रचना करणार ? अशी रचना तर आम्ही च करूं. आम्ही आमचें सर्व उद्योग लोक-सेवेसाठीं करूं व पै न पैचा हिशेब लोकांच्यासमोर ठेवूं. पोटासाठीं जेवढें लागेल तेवढें च आम्ही घेऊं अधिक घेणार नाहीं. त्याचा हि हिशोब आम्ही जनतेसमोर ठेवूं. त्यावर जनतेचें काय म्हणणें आहे हें आम्ही ऐकण्याची इच्छा राखूं. जनतेच्या टीकेंत सत्य असेल तर आम्ही दुरुस्ती करण्यास नेहमीं तयार राहूं.

## व्यापाऱ्यांत तीन गुण

खाजगी मालकी राहिली नाहीं तर व्यापाऱ्यांना भांडवल लावण्याची प्रेरणा कशी होईल असें जेव्हां लोक विचारतात तेव्हां मला त्याचें आश्चर्य वाटतें. जर सगळे धंदे राष्ट्राचे मानले गेले तर व्यापारी त्यांत सहकार्य करतील ? आज ते आपण होऊन स्वयंस्फूर्तीनें भांडवल लावतात व बुद्धि वापरतात. तसें ते पुढें हि करतील ? बिर्ला, टाटा सारखे महाजन स्वार्थाची प्रेरणा असेल तर च भांडवल लावतील असें हे लोक समजावूं इच्छितात. पण असें म्हणणें म्हणजे ह्या महाजनांची बदनामी करणें आहे. शास्त्रकारांनी वणिकांपासून, व्यापाऱ्यांपासून जी अपेक्षा राखली आहे, त्यांच्याविषयीं जी निष्ठा दर्शविली आहे तिला अनुसरून जर हे लोक वागतील तर महात्मा गांधीपेक्षां त्यांना कमी प्रतिष्ठा लाभणार नाहीं.

मी असें बोलूं लागलों कीं लोक विचारतात, महात्मा गांधींच्या विचार-सरणीला अनुसरून हे टाटा, बिर्ला सारखे शेठ ट्रस्टी बनले आहेत ? मी म्हणतों कीं, कोणा व्यक्तीची परीक्षा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
घेण्याचें माझें काम नाहीं. बिर्लाजींच्या हृदयांत सज्जनता आहे आणि करुणा हि पुष्कळशी आहे अेवढें मला माहीत आहे. जो परमेश्वर मला असें बोलण्याची प्रेरणा देतो तो त्यांना हि प्रेरणा अवश्य देईल.

एका बड्या व्यापाऱ्याशीं माझें अशा प्रकारचें बोलणें झालें होतें. मीं त्याला सांगितलें कीं, महात्मा गांधी आपल्यापासून अशी आशा राखतात कीं, तुम्ही ट्रस्टी बनावे, तुमच्या व्यवस्थाशक्तीचा, संपत्तीचा, बुद्धीचा व करुणा-वृत्तीचा उपयोग सेवा-कार्यांत व्हावा. तेव्हां ते म्हणाले 'ही गोष्ट माझ्यासाठीं कठिण नाहीं.' त्यांनीं या बाबत एक सुंदर कारण हि दिलें. त्यांनीं सांगितलें " तुम्ही पाहतां च कीं 'दुनियेंतील व्यापारी जसे ऐष-आरामांत आणि छान-छोकींत राहतात तसा मी राहत नाहीं, माझें जीवन अगदीं साधें आहे. " त्यांचें हें म्हणणें खरें होतें. ते दुनिया फिरून आले होते हें त्यांनीं सांगितलें तेव्हां च मला कळलें. मीं असे कित्येक व्यापारी पाहिलें आहेत कीं ज्यांचा घरचा एकूण प्रकार सर्वसाधारण लोकाप्रमाणें असतो. ते इतक्या साधेपणानें राहतात कीं, पाहणाऱ्याला लक्षांत हि यायचें नाहीं कीं अमुक मनुष्य कोट्याधीश आहे. हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांत करुणा आहे व्यवस्थाशक्ति आहे आणि याशिवाय साधेपणा हि आहे. हे तीन गुण जिथें एकत्र आहेत तिथें हे लोक करुणेचें राज्य कां स्थापू शकणार नाहींत ?

## होऊं द्या तुमची आमची शर्यत

तुम्ही पाहतां कीं मी एका-एका जमीनवाल्यापाशीं जाऊन जमीन मागतों, पण एका-एका व्यापाऱ्याजवळ जात नाहीं. कारण जमीनवाल्या लोकांत स्वतंत्रपणें विचार समजण्याची शक्ति नाहीं. व्यापाऱ्यांत ती आहे. म्हणून मी इकडे काम करीत असलों तरी तिकडे व्यापारी सहज समजून जातात. वर्गांत मठ्ठ विद्यार्थ्याला खूप शिकवावें लागतें, हुशार विद्यार्थी सहज शिकून घेतो. हिंदुस्थानचे व्यापारी पुढें येऊन माझें काम केव्हां उचलून घेतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
क्रमांक 2(73) दि. [illegible]

ह्याची मी वाट पाहत आहें. ते येऊन मला म्हणतील "जमीन प्राप्त करण्याचें काम तुम्हाला साधलें आहे तर तें तुम्ही करा. पण तुम्ही प्राप्त केलेली जमीन उत्तम बनविणें, तिच्यांतून अधिकांत अधिक उत्पन्न काढणें आमचें काम आहे. ह्या कामीं आमची तुमची शर्यत लागली आहे समजा. तुम्ही आतांपर्यंत बेचाळीस लाख एकर जमीन मिळविली आहे ना? तिला उत्तम बनविण्याचें काम आमचें."

मी हें सांगूं इच्छितों कीं, हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांत अशा प्रकारची स्फूर्ति उत्पन्न झाली तर हिंदुस्थानांत करुणेचें साम्राज्य होतें की नाहीं, त्याचा परिणाम पाकिस्तानावर होतो कीं नाहीं, विश्वशांतीवर होतो कीं नाहीं, आणि ह्या सर्वांचें फळ म्हणून शस्त्र-बळाची किंमत जगांत कमी होते कीं नाहीं, हें तुम्ही पहा!

## भारतीय संस्कार

जर्मनीच्या लोकांनीं करोडों लोकांचें बलिदान आणि अमाप पैसा जगाला जिंकण्यासाठीं खर्च केला पण अेवढें बलिदान व त्याग करून ते जगाच्या सेवेसाठीं निघते तर ते केव्हां च दुनियेचे मालक बनते. हिंसेची शक्ति वाढण्यासाठीं त्यांनीं अेवढी व्यवस्था-शक्ति योजना-शक्ति व पैसा लावला हें पाहून आश्चर्य वाटतें, हें सर्व आजू बाजूंच्या लोकांना जिंकण्यासाठीं त्यांनीं केलें. पण तरी हि ते त्यांना जिंकू शकले नाहींत. पण हे च लोक दयेनें प्रेरित होऊन दुनियेची सेवा करते तर दुनिया आज त्यांची कीर्ति गाती. माझा असा विश्वास आहे कीं, करुणेचें राज्य स्थापित करण्याचें कोणाला सुचेल तर तें आधीं हिंदुस्थानला सुचेल व त्याचा आरंभ हि कोठें होणार असेल तर तो येथें च होईल. मी मालकी नाहींशी करण्याच्या गोष्टी बोलतों तेव्हां लोक मला विचारतात पन्नास वर्षांत तरी दुनियेंतील मालकी नष्ट होईल काय? सर्व दुनियेंत ही गोष्ट पन्नास वर्षांत घडेल असा मला विश्वास नाहीं. पण भारतांत मात्र ती अवश्य घडूं शकेल असा विश्वास मला आहे.

कारण भारताचे संस्कार च अशा प्रकारचे आहेत. भारताच्या लोकांत राज्येच्या राज्यें तृणाप्रमाणें फेकून देणारीं माणसें होऊन गेलीं.

## भूदान-पूर्तीचा भार शिरावर घ्या

रामचंद्राच्या राज्याभिषेकाची गोष्ट चालली. परंतु ठरलें कीं त्यांना वनांत जायचें आहे. ते कौसल्या मातेस भेटण्यासाठीं गेले. ती म्हणाली, "बाळ! तुझ्या राज्याभिषेकाची गोष्ट ऐकून मला किती आनंद होतो आहे." रामचंद्र म्हणाले, "आई, मला जंगलाचें राज्य मिळालें आहे, मी जात आहे मला आशीर्वाद दे." हें ऐकतां च मातेस एकक्षणभर च धक्का बसला. लगे च ती म्हणते, "राजाची आज्ञा आहे आणि तुझ्या दुसऱ्या आईची हि इच्छा आहे, तर जरूर जा." कौसल्या म्हणते, "राजवंशीय लोकांना अखेरच्या दिवसांत वनांत जावें च लागतें. फरक इतका च कीं तुला आतां जावें लागत आहे." हा आमच्या संस्कृतीचा आदर्श आहे. हा आदर्श सिद्ध करण्याचें काम जर कोणाला करायचें आहे तर तें वैश्यांना. प्रेरणा देण्याचें काम ब्राह्मणाचें आहे व तें महान् आचार्यांनीं केलेलें आहे. त्याला आकार देणें, त्याला व्यवहाराचें रूप देणें, व्यापाऱ्यांचें कर्तव्य आहे. म्हणून मी व्यापाऱ्यांजवळ जाऊन विचारीत नाहीं कीं, तुम्ही किती संपत्तिदान द्याल? त्यांच्यापासून माझी ह्याहून फार मोठी अपेक्षा आहे. भूदान पूर्तीची जबाबदारी त्यांनीं उचलावी अशी बाबाची इच्छा आहे. त्यानें व्यापाऱ्यांना प्रतिष्ठा प्राप्त होईल.

## चूक कुठें आहे?

व्यापाऱ्याखेरीज जीवन चालूं शकत नाहीं हें सर्वांना माहीत आहे. व्यापारी इकडचा माल तिकडे व तिकडचा माल इकडे धाडतो त्यामुळें जीवन चालतें. पण इतकें असून हि व्यापाऱ्यांना हिंदुस्थानांत शिव्या बसतात. त्यांच्याशिवाय काम भागणार नाहीं अशी शास्त्रकारांनीं त्यांना प्रतिष्ठा दिलेली आहे. त्यांच्या ठिकाणीं करुणावृत्ति,

रा. क्र. ७५५३१

व्यवस्थाशक्ति व साधेपणा हि आहे. पण इतकें असून हि काम होत नाहीं व त्यांना शिव्या खाव्या लागत आहेत. तेव्हां यांत चूक कोठें आहे तें शोधलें पाहिजे. पणती आहे, तेल हि आहे, परंतु वात नसेल तर उजेड पडत नाहीं; घरांत वीज आली आहे पण तिचें बटन दाबलें नाहीं म्हणून अंध:कार आहे. एवढा मोठा गुणवान वैश्यसमाज हिंदुस्थानांत असतां बाबाला कशाची चिंता ?

माझा विश्वास आहे कीं बाबाचें अवशिष्ट काम व्यापारी हातीं घेतील, त्यांच्या पूर्तीसाठीं जें कांहीं करायचें तें करतील. परंतु व्यापारी उलट माझ्याकडे येतात व मला पैसा देऊं इच्छितात. मी म्हणतों मी ब्राह्मण आहें व मूर्ख आहें. पैशाचा उपयोग कसा करावा मला कळत नाहीं. म्हणून तुम्ही च त्या पैशाचा उपयोग करुणा-वृत्तीनें, व्यवस्थाशक्ति वापरून साधी राहणी ठेवून करा, व माझें काम अंगावर घ्या. पैसा देऊन मला व्यर्थ बदनाम करूं नका. बैलाचें काम घोड्याच्यानें होणार नाहीं. शेताच्या कामाला बैल पाहिजे. जोरानें धांवण्यासाठीं घोडा पाहिजे. बाबा घोडा आहे व तुम्ही बैल आहांत. बाबाचा घोडा अश्वमेधाच्या घोड्याप्रमाणें स्वैर संचार करून विचार-प्रचार करील, पण प्राप्त झालेल्या जमिनीचा उत्तम उपयोग करणें हें काम व्यापाऱ्यांचें आहे.

## अपूर्व अवसर

हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांना ही उत्तम संधि आहे. महात्मा गांधींनीं व्यापाऱ्यांपासून मोठी अपेक्षा राखली होती. माझे प्रिय जातवाले काय करीत आहेत हें त्यांचा आत्मा पाहत आहे. भूदान यज्ञ द्वारां मालकी हक्क नष्ट करण्याचा महायज्ञ सुरू झालेला आहे. ह्या वेळीं करुणावान वैश्य-वृत्तीचे लोक आहेत त्यांना करुणेचें राज्य स्थापन करण्याची ही संधि आहे. हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांना अत्यन्त विश्वासपूर्वक मी हें आवाहन करीत आहें.

अडोनी ( आंध्र )

२४-३-५६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम २८१३४ दि: [illegible]

REFBK-0015732
REFBK-0015732